



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २९१ वा | सोमवार दि. २० जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बोथेंची बडतर्फी तर झाली फौजदारी कारवाईचे भिजत घोंगडे राहणार का?

## इतर दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई होणे गरजेचे...

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयातील महाभ्रष्टाचारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर अखेर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बडतर्फीची कारवाई करण्यात आली. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनची वृत्तमालिका व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेला पाठपुरावा, यामुळे बोथे यांना जबरदस्त टोला बसला आहे. परंतु केवळ बोथेंची बडतर्फी ही पुरेशी नसून, या प्रकरणात आणखीही कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. कारण ही कठोर कारवाई झाल्यास यानंतर कोणी अशाप्रकारचा भ्रष्टाचार करण्यास धजावणार नाही. त्यामुळे आता पुढील त्यांची अवैध संपत्ती जप्तीची व फौजदारी कारवाई कधी होईल किंवा या कारवाईचे भिजत घोंगडे राहणार, हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होणार आहे.लायकी नसतानाही भांडारपालसारख्या वरिष्ट पदावर पोहोचण्याचा विक्रम प्रकाश नामदेव बोथे यांनी केलेला आहे. अनेक प्रकारच्या तिकडमबाज्या करून आणि वरिष्ठांशी अर्थपूर्ण साटेलोटे करून बोथेंनी भांडारपाल हे पद अक्षरशः बळकावले. त्यानंतर भ्रष्टाचारासाठी चटावलेल्या बोथे यांनी अत्यंत बेबंदपणे आणि बेशरमपणे भ्रष्टाचार केला. कुठलीही लाज-लज्जा, शरम बोथे यांनी भ्रष्टाचार करताना बाळगली नाही. जिल्हा रुग्णालयाचा भांडार विभाग आपल्या बापाचा असल्याच्या अविर्भावात बोथेंनी भ्रष्टाचार केला. प्रकाश बोथे हे भ्रष्टाचारात एव्हढे रममाण झाले होते की, त्यांनी सातत्याने वरिष्ठांच्या आदेशांचीही अवहेलना केली. दुसरीकडे जिल्हा रुग्णालयात बसून जिल्हा रुग्णालयाला वाळवीसारखे पोखरण्याचे काम केले. त्यांनी कामकाज रेटताना अनेकदा नियमांना बगल दिली. अनेकदा वरिष्ठांच्या अधिकारांवर गदा आणून स्वतःचे भ्रष्टाचाराचे घोडे दामटले. एकीकडे विविध प्रकारची उपकरणे, वस्तूंच्या खरेदीत तर बोथेंनी भ्रष्टाचाराचा कहर केला, दुसरीकडे त्यांनी छपाईसारख्या कामातदेखील भ्रष्टाचाराचा नवा फंडा शोधून काढला. तेथेही त्यांनी वित्तीय मर्यादेच्या

**महाभ्रष्टाचारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांनी भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची चल अचल संपत्ती जप्त करून त्याची लिलाव करून येणारा पैसा शासन तिजोरीत जमा न केल्यास २५ जानेवारी २०२५ ला अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार**

बाहेर जाऊन खर्च करीत शासनाला चुना लावण्याचे काम केलेले आहे. शासनाने वस्तू खरेदीचे किंवा बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंटचे नियम आखून दिलेले आहेत, त्या नियमांची पायमल्ली केली. अव्वाच्या सव्वा दराने बिले मंजूर करवून त्यातून आपल्या मर्जीतील भ्रष्ट कंपन्यांचे उखळ पांढरे केले व त्यातून स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले. निविदा काढताना कुठलाही नियम पाळला नाही. साहित्य व उपकरणांच्या खरेदीत निविदा प्रसिद्धिपूर्वी खरेदी नियमावली नुसार प्रथम प्रशासकीय मान्यता निर्गमित करून नंतर खरेदी प्रक्रिया राबवणे आवश्यक असताना सक्षम प्राधिकारी यांची प्रशासकीय मान्यता न घेतचा निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. म्हणजे पदोपदी आणि पावलोपावली निर्लज्जपणे बोथेंनी भ्रष्टाचार केलेला आहे. बोथे यांच्या भ्रष्टाचाराने जिल्हा रुग्णालयासह त्याअंतर्गत येणाऱ्या इतर रुग्णालयांमध्ये इतका कहर माजवला की, अक्षरशः बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड आणि चिखलीच्या आमदार श्वेता महाले यांना हे मुद्दे थेट राज्य शासनापर्यंत नेऊन मांडावे लागले. परंतु तोपर्यंत प्रकाश नामदेव बोथे हे भ्रष्टाचार करून-करून इतके मस्तवाल झाले होते की, त्यांनी त्यानंतरही भ्रष्टाचार कमी केला नाही. प्रकाश नामदेव बोथे यांनी मुजोरी एव्हढी वाढली होती की, त्यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात चौकशी करण्यासाठी जी समिती आली होती, त्या समितीला त्यांनी कागदपत्रे देण्यास साफ नकार दिला. समितीकडे दस्तऐवज हस्तांतरित केले नाही.




प्रकाश बोथे यांची कारकिर्द आणि त्यांचा भ्रष्टाचाराची पापं पाहता त्यांच्यावर आता बडतर्फीची कारवाई तर झालेली आहे. परंतु ही कारवाई पुरेशी नाही. बडतर्फीचीच कारवाई करण्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खरेतर खुप विलंब लावलेला आहे. येत्या काळात प्रकाश नामदेव बोथे यांनी भ्रष्टाचारातून करोडो रुपयांची जी अवाढव्य अवैध चल अचल संपत्ती कमावली आहे, ती जप्त करून त्याची लिलाव करून येणारा सर्व पैसा शासन दप्तरी जमा करावी. तसेच त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा खटला चालवावा. जोपर्यंत ही कारवाई होत नाही. तोपर्यंत जिल्हा रुग्णालय आणि आरोग्य विभागावर ताशेरे ओढण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# भगवानगडाचे महंत नामदेवशास्त्री यांची कायंदे यांच्या निवास्थानी सदिच्छा भेट!...

## कायंदे परिवाराला समाजसेवेचा अध्यात्मिक वारसा -शास्त्री

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

स्व. देवानंदभाऊ कायंदे यांना अध्यात्माची गोडी होती, सर्व समाजाला सोबत घेऊन सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात बंधूभाव निर्माण करण्याचे कामही देवानंदभाऊ यांनी केले.. तोच वसा व वारसा आमदार मनोज कायंदे व त्यांचे बंधू सतीश कायंदे यांच्यात उतरला असून, त्यांना मातोश्री नंदाताईंचे मार्गदर्शन असल्याने.. कायंदे परिवार समाजसेवेचा आध्यात्मिक वारसा पुढे चालवत असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत प.पू. नामदेव शास्त्री महाराज यांनी केले. भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी गुरुवार १६ जानेवारी रोजी देऊळगावराजा येथे कायंदे परिवाराच्या निवासस्थानी शुभेच्छा भेट दिली, त्यावेळी त्यांनी संवाद साधताना कायदे परिवाराचे भरभरून कौतुक केले. देवानंदभाऊंच्या स्मृतींना उजाळा त्यांनी दिला तर सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आल्याबद्दल मनोज कायदे यांचे कौतुक केले. कायदे परिवाराच्या प्रत्येक सुख दुःखात भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी हजेरी लावली आहे. स्व. देवानंदभाऊ आणि नामदेव शास्त्री यांच्यात चांगली मैत्रीसुद्धा होती. एका आध्यात्मिक कार्यक्रमासाठी जात असताना नामदेवशास्त्री यांनी देऊळगावराजा येथे कायंदे यांच्या निवासस्थानी भेट देऊन या संपूर्ण परिवारासोबत खुप वेळ घालवला. अनेक जुन्या आठवणी, वर्तमान परिस्थिती व भविष्यात करावयाची कामे.. यावर बराचवेळ संवाद चालला. मनोजमध्ये असलेला संयम व त्याची शिस्त याचेही त्यांनी कौतुक केले. यावेळी कायंदे परिवाराच्या वतीने शास्त्रीजींचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी आ. मनोज कायदे यांच्यासह नंदाताई कायंदे, सतीश व सौ. कल्पना कायंदे, सौ. वर्षाताई मनोज कायंदे, भगिनी सौ. सुरेखाताई मुंडे व कायंदे परिवारातील अन्य सदस्य तथा स्नेहीजन उपस्थित होते. मनोज कायंदे यांना आमदार म्हणून मिळालेला पहिला पगार त्यांनी, अध्यात्मिक सत्कार्यासाठी दिला. त्यांचे वडील देवानंदभाऊ कायंदे हे नेहमीच मंदिर व आश्रमात समाजसेवेसाठी दान देत. हीच सत्कार्यासाठी देण्याची परंपरा आ. मनोज कायंदे यांनी पुढे चालू ठेवली, हे येथे उल्लेखनीय!

# ११,५३६ विद्यार्थ्यांनी दिली नवोदयाची निवड चाचणी परीक्षा...

## ४० केंद्रांवर पार पडली परीक्षा ४० बैठ पथक होते तैनात पोलीस बंदोबस्त, सीसीटिव्हींची निगराणी

जनसंचलन/ बुलढाणा

जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता ६ वीसाठी आज जिल्ह्यातील ४० केंद्रांवर निवड चाचणी परीक्षा सुरुळीत पार पडली. या परीक्षेसाठी जिल्हाभरातून तब्बल १२,०७३ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते त्यापैकी ११,५३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. या निवड चाचणी परिक्षेसाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त आणि सीसीटिव्हीची निगराणी ठेवण्यात आली होती. तसेच परिक्षेचे कामकाज सुरळीतपणे चालण्याकरिता जिल्ह्यातील १३ तालुक्यामध्ये तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाची नेमणुक करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार तहसीलदारांनी परिक्षेदरम्यान परीक्षा केंद्रास भेटी देवून परीक्षा केंद्रांची पाहणी केली. या संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर निगराणीसाठी महसूल विभागाची यंत्रण कार्यरत होती. या परिक्षेचे कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने ४० बैठे पथकांचीही नेमणूक करण्यात आली होती. या पथकांमुळे परीक्षा केंद्रावर कॉपी विरहीत परीक्षा पार पडण्यास मदत झाली. जिल्ह्यातील ४० परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडली. या परीक्षा केंद्रावर तसेच प्रक्रियेवर सातत्याने लक्ष ठेवून होतो. कोणत्या परीक्षा केंद्रावर अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने खबरदार घेतली होती.




परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी केंद्रावर सर्व सोयीसुविधा देण्यात आल्या होत्या. त्यांच्या पालकांनीसुद्धा प्रशासनाला सहकार्य केले. एकंदरीत जिल्ह्यातील सर्वच परीक्षा केंद्रावर जवाहर नवोदय विद्यालयाची निवड चाचणी परीक्षा सुरळीत आणि शांततेत पार पडली,फक्अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

# विद्याविश्व हॉस्पिटलची विश्वसनीय दमदार कामगिरी....

## विश्वकर्मा बांधकाम मजुर आरोग्य योजनेअंतर्गत हॉस्पिटलमध्ये रेकॉर्ड ब्रेक २०० शस्त्रक्रिया...

जनसंचलन/बुलढाणा

डॉक्टर हे आपल्या समाजाचे खरे रक्षक असतात.ते आपल्या आरोग्याची काळजी घेतात, आपल्याला आजारातून बरे करतात आणि आपल्या जीवनात आनंद आणतात. त्यांचे योगदान अमूल्य आहे. बुलढाणा जिल्ह्यात अल्पावधीत काळात जिल्हावासियांच्या मनात रुजलेले हॉस्पिटल म्हणजेच विद्याविश्व हॉस्पिटल आहे. कारण ही तसेच आहे. हॉस्पिटल सुरू होऊन अवघे दोन वर्षे झाली आहे मात्र हॉस्पिटलची कामगिरी सुद्धा दमदार आहे अवघ्या तीन महिन्यांमध्ये विश्वकर्मा बांधकाम मजूर आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया तसेच सर्व आरोग्य विम्या अंतर्गत कॅशलेस उपचार करण्यात आले. या योजनेअंतर्गत हॉस्पिटलमध्ये तीन महिन्यांमध्ये रेकॉर्ड ब्रेक कामगिरी करण्यात आली. २०० बांधकाम मजुरा-





वर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आणि विशेष या सर्व शस्त्रक्रिया योजनेअंतर्गत मोफत करण्यात आल्या. हे दुसरे कुठले हॉस्पिटल नसून **डॉक्टर अभिलाष माळी यांचे विद्या विश्व हॉस्पिटल सुपर स्पेशालिटी सर्जिकल लेप्रोस्कोप व ट्रॉमा केअर** आहे यामध्ये पित्ताशय शस्त्रक्रिया, अस्थिरोग शस्त्रक्रिया, तसेच दुर्बीण द्वारे सर्व शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ब्रेस्ट सर्जरी (स्तनाची शस्त्रक्रिया), हर्निया सर्जरी,बर्न युनिट,ट्रॉमा व क्रिटिकल केअर, दुर्बीण द्वारे अपेंडिक्स, पित्ताशयाची शस्त्रक्रिया, शरीरावरील विविध गाठीचे निदान व शस्त्रक्रिया, पोटाची व छोट्या आतडीची शस्त्रक्रिया,मूळव्याध भगंदर व फिशर शस्त्रक्रिया, गर्भपिशीची शस्त्रक्रिया, थायरॉईड ग्रंथीचे आजार व शस्त्रक्रिया, लहान मुलांनी गिळलेली पोटातील नाणी व पिन, बॅटरी चिरा न देता एन्डो स्कोपी द्वारे काढण्यात येतील, त्वचारोपण शस्त्रक्रिया, डायबेटिक फूट शस्त्रक्रिया, फायमोसिस करिता सकम सीजन शस्त्रक्रिया, डायगोसटिक थेरीपीटीक एन्डोस्कोपी आशा विविध शस्त्रक्रिया या ठिकाणी झाल्या आहेत. डॉ अभिलाष माळी यांनी बांधकाम मजुर कार्ड धारकांना आवाहन केले आहे कि, यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

# गावातील शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते खुले होणार

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यामधील सर्व गावामध्ये शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते कालबद्धरितीने खुले करण्यासाठी जिल्हा महसूल प्रशासनाने २० जानेवारी ते ३१ मार्च २०२५ पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुषंगाने कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून या कालबद्ध कार्यक्रमाचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नुकतेच जारी केले आहे. या कालबद्ध कार्यक्रमानुसार, पहिल्या टप्प्यात दि २० ते २४ जानेवारीपर्यंत संबंधित गावच्या तलाठी यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडुन ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग नमूद असलेले गाव नकाशे प्राप्त करुन घेणे. दुसऱ्या टप्प्यात दि. २५ ते ३१ जानेवारी पर्यंत या नकाशातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग हे प्रत्यक्ष भेट देऊन त्यातील बंद असलेल्या रस्त्याची यादी तयार करणे. तिसऱ्या टप्प्यात दि. १ ते ७ फेब्रुवारीपर्यंत बंद असलेले रस्ते ज्या भुमापन क्रमांकातून जातात त्यांचे भोगवटाधारकांची यादी तयार करणे. चौथ्या टप्प्यात दि. ८ ते १५ फेब्रुवारीपर्यंत भोगवटाधारक व गावातील सरपंच व इतर सहधारक यांची सदर रस्ता खुला करण्याबाबत बैठक आयोजित करुन समन्वयाने व सर्वसहमतीने रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार तहसिलदार यांच्याकडे दाखल असलेल्या प्रकरणात सर्व पक्षकार गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषि सेवक यांच्या समवेत त्या त्या वादग्रस्त ठिकाणी स्थळ निरीक्षण करुन बैठक घेऊन संपवुन सर्व सहमतीने रस्ता खुला करण्यासाठी व दावा निकाली काढण्यासाठी लोकअदालतीच्या निकषानुसार प्रकरणात निर्णय घेणे. पाचव्या टप्प्यात दि. १६ ते २८ फेब्रुवारीपर्यंत चौथ्या टप्प्यातील प्रयत्नातून रस्ता खुला होत नसल्यास उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या सहाय्याने रस्ता निश्चित करुन पोलिसांचे सहाय्याने तो खुला करणे. या कालबद्ध कार्यक्रमाच्या अंतिम टप्यात दि. १ ते ३१ मार्चपर्यंत पाचव्या टप्प्यानुसार रस्ता खुला न झालेल्या प्रकरणांमध्ये मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज प्राप्त करुन घेऊन उचित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. या कालबद्ध कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी),सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख व पोलीस निरीक्षक यांनी समन्वयाने कामकाज करून ग्रामीण भागातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब) पायमार्ग कालबद्धरितीने खुले करावे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.



# नवउद्योजक, निर्यातदारांनी जिल्ह्यात प्रक्रिया उद्योग उभारावे- जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात कापूस, मका, सोयाबीन इ. शेतमालाचे उत्पादन मोठ्याप्रमाणात होते. परंतू शेतीमालावर प्रक्रिया करुन निर्यात करणारे उद्योग कमी आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील नवउद्योजक, निर्यातदारांनी कच्चा शेतमालावरील प्रक्रिया उद्योग उभारुन निर्यात वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी करत या उद्योगांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून भरीव अनुदानही दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील पुढे म्हणाले की, बुलढाणा जिल्हा हा अमरावती विभागात सर्वाधिक निर्यात करणारा जिल्हा आहे. सन २०२३-२४ मध्ये ८४१ कोटी निर्यात केली आहे. तसेच ऑक्टोबर २०२४ पर्यंत ४६५ कोटी झाली आहे. त्यात प्रामुख्याने कापूस,ऑरगॅनिक केमिकल्स,कॉस्मेटिक उत्पादने, इंजिनियरिंग उत्पादने, डाळी, बी-बियाणे, रोपटे इ.निर्यात केली जाते. बुलढाणा जिल्हा हा कृषिप्रधान आहे. जिल्ह्यात शेतमालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात आहे, परंतू शेतमालावर प्रक्रिया करुन निर्यात करणारे उद्योग घटक फारसे नाहीत. त्यामुळे जिल्ह्यात कापूस व मक्यावर प्रक्रिया करुन उपउत्पादने तयार करुन निर्यात करणारे उद्योग उभारणे आवश्यक आहे. देशात ६० टक्के खाद्यतेल हे आयात केले जाते. बुलढाणा जिल्ह्यात सोयबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते, परंतू प्रक्रिया उद्योग नसल्याने कृषी उत्पादनाला फारसा भाव मिळत नाही. यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, कंपन्यांनी कृषीमाल संकलित करुन प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या औद्योगिक समूह योजनेअंतर्गत अन्न प्रक्रिया, फळ प्रक्रिया यासारखे नवीन समूह उद्योग उभारण्यात यावेत. जिल्ह्याची औद्योगिक, आर्थिक क्षमता ही जमेची बाजू आहे. भविष्यात बुलढाणा जिल्हा हा औद्योगिक हब होऊ शकतो. नवउद्योजक, निर्यातदारांनी मरगळ झटकून जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी मैदानात उतरले पाहिजे. जिल्ह्याला समृद्धी महामार्ग जोडला आहे. या महामार्गावर जागा घेवून उद्योग उभारण्यास वाव आहे. उद्योग उभारणीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमार्फत ९० टक्क्यापर्यंत भरीव अनुदानही दिले जाते त्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी यांनी केले. परदेशातील आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एखाद्या उत्पादनाची निर्यात करतांना त्या देशातील सुरक्षा मानकांची (सेफ्टी स्टॅन्डर्ड) माहिती करुन घेण्याची गरज आहे. त्यासाठी निर्यात प्रोत्साहन परिषदामधून, एआय तंत्रज्ञान, इंटरनेटवरुन माहिती घेवून उद्योगात प्रगती करावी. उद्योग विभागामार्फत आयोजित केले जाणारे समिट, कार्यशाळा, खरेदी-विक्री करणाऱ्यांसाठीच्या बैठकांमध्ये निर्यातदार, उद्योजकांनी सहभागी होऊन इतर उद्योगांचा तुलनात्मक अभ्यास करावा. त्यातून आपले उत्पादन निवडावे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपले उत्पादन वाढविण्यावर आणि त्याच्या गुणवत्ता वाढीवर भर देणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले. उद्योग सहसंचालक निलेश निकम म्हणाले की, उद्योग संचालनालयामार्फत ३६ जिल्ह्यात कार्यशाळा घेण्यात येत आहे. केंद्र शासनामार्फत ङ्गएक जिल्हा, एक उत्पादनफ हे धोरण राबविले आहे, तर महाराष्ट्र शासनातर्फे ङ्गएक जिल्हा,दोन उत्पादनफ हे धोरण राबविले आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यासाठी कापूस व बी-बियाणे या उत्पादनाची निवड करण्यात आली असल्याचे ते म्हणाले. नागपूरच्या विदेश व्यापार अतिरिक्त महासंचालक स्नेहल ढोके म्हणाल्या की, उद्योजकांना निर्यात करण्यासाठी लागणारे आयात निर्यात प्रमाणपत्र () ५०० रुपये शुल्कात ऑनलाईन देण्यात येते. विदेश व्यापार महासंचालनालयामार्फत एक्सपोर्ट प्रोमोशन कॅपिटल गुड्स अंतर्गत उद्योजकांने मशिनरी बाहेरुन आयात केल्यास त्यावर लागणारी कस्टम ड्युटी माफ केली जाते. पुढील सहा वर्षात माफ केलेल्या कस्टम ड्यूटीच्या सहा पट निर्यात करणे आवश्यक आहे. यासाठी दोन वर्षाची मुदतवाढ दिली जाते.ॲडव्हान्स अथोरायझेशन या योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या कच्चा मालावर जीएसटी माफ केले जाते. अशी माहिती स्नेहल ढोके यांनी दिली. येथील बुलढाणा अर्बन रेसीडेन्सी क्लब येथे आयोजित निर्यातदार प्रोत्साहन कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या कार्यशाळेला अमरावती क्षेत्राचे उद्योग सहसंचालक निलेश निकम, नागपूरच्या विदेश व्यापार अतिरिक्त महासंचालक स्नेहल ढोके,नाबार्डचे सहाय्यक प्रबंधक गाढे, डाक अधिक्षक गणेश अंभोरे, भारतीय निर्यात ऋण गॅरंटी निगमचे व्यवस्थापक बोरकर, सल्लागार अंकित गुप्ता, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवस्थापक सुनिल पाटील उपस्थित होते. या मान्यवरांनी निर्यातीबाबत ध्येय, धोरणे व सोयीसुविधांविषयी सादरीकरण केले. या कार्यशाळेच्या अंतिम टप्प्यात प्रश्नोत्तरे घेवून शंकांचे निरसन करण्यात आले. त्यानंतर आभार प्रदर्शन करुन कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

# शासकीय योजनांच्या लाभासाठी शेतकऱ्यांना आता फार्मर आयडी मिळणार !

## ॲग्रिस्टॅक योजना आता सेल्फ, कॅम्प आणि सीएससी मोडवर सोमवारपासून बुलढाणा जिल्ह्यात मोहिमेस सुरुवात

जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पात्र जलदगतीने पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच निर्मिती आणि शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी तयार करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना स्वत: किंवा शिबिरात आणि सीएससी केंद्रावर नोंदणी करता येणार असून या ॲग्रिस्टॅक योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांमार्फत शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचे आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येणार




असून उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरण अर्थात ई-केवायसीची आवश्यकता राहणार नाही. शेतकरी माहिती संचनिर्मितीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी तीनही मोड म्हणजेच सेल्फ, कॅम्प आणि सीएससी मोडव्दारे उद्या दि.२० जानेवारीपासून बुलढाणा जिल्ह्यात करण्यात येणार आहे. सर्व शेतकरी बांधवांनी गावनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या शिबीरात जास्तीत जास्त संख्येने सातबारा उतारा, ८अ व आधारकार्डसह उपस्थित राहून आपले ग्राम महसूल अधिकारी, तहसिल कार्यालय व कॉमन सर्व्हिस सेंटरशी संपर्क साधून ॲग्रिस्टॅक योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे. ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत फार्मर आयडीसाठी https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh/#/ या लिंकवर नोंदणी करावी किंवा क्यूआर कोडचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पैशासाठी विवाहितेचा केला त्यांनी शारिरीक व मानसिक छळ...



जनसंचलन/ खामगाव

माहेरवरून पाच लाख रूपये आणण्यासाठी एका २० वर्षीय विवाहितेचा छळ करण्यात आला. यांप्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरून खामगाव शहर पोलीसांनी सासरच्या ९ जणांविरोधात गुरुवारी रात्री गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, मोनू ऋषीकेश खिरडकर रा. रेखा प्लॉट खामगाव या विवाहितेचे लग्न ऋषीकेश सुभाष खिरडकर (२७) यांच्याशी झाले. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस तिला चांगले वागविले. मात्र, त्यानंतर माहेरवरून पाच लाख रूपये आणण्यासाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ करण्यात आला. या तक्रारीवरून शिवा-जी नगर पोलिसांनी ऋषिकेश सुभाष खिरडकर, सुभाष रामदास खिरडकर, उषा सुभाष खिरडकर, योगेश सुभाष खिरडकर, प्राची गोकुळ गंगातिरे सर्व रा. सतीफैल पूजा गोपाळ राहूळकर रा. जळगाव खा. यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव-२०२५ अध्यक्षपदी राजेंद्र काळे तर सचिवपदी उमेश शर्मा !

जनसंचलन/बुलडाणा

महाराष्ट्रासाठी पथदर्शक व दिशादर्शक ठरलेल्या छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते पत्रकार राजेंद्र काळे यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी उमेश शर्मा यांचे नाव निश्चित करण्यात आले. दरम्यान मावळते अध्यक्ष धर्मवीर आमदार संजूभाऊ गायकवाड यांनी, राजमाता जिजाऊ चौकातील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर परिसरात अध्यक्षपदाची सूत्रे राजेंद्र काळे यांच्या स्वाधीन केली. जगात भारी, १९ फेब्रुवारी.. जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती. हीच जयंती २०१६ पासून बुलढाणा शहरात सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून साजरी करण्याची परंपरा सुरू झाली, २०२५ हे २१व्या शतकातील रौप्य महोत्सवी वर्ष.. त्यामुळे यावर्षी शिवजयंतीचे एक विशेष महत्त्व आहे. त्याच अनुषंगाने आज शनिवार १८ जानेवारी रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज मंदिर प्रांगणात नियोजनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम सूत्रसंचालनातून प्रा. अमोल वानखेडे यांनी शिवजयंती सोहळ्याची भूमिका विशद केली. त्यानंतर मागील वर्षीच्या कार्यक्रमाचा व खर्चाचा लेखाजोखा अरविंद होंडे यांनी मांडला. यानंतर माजी अध्यक्ष प्रा. अनिल रिंढे, रणजीतसिंह राजपूत, राजेश हेलगे, डॉ. शोन चिंचोले यांनी आपली मनोगत व्यक्त केली. यावेळी मंचावर डॉ. राजेश्वर उबरहंडे व मृत्युंजय गायकवाड उपस्थित होते. अध्यक्षपद निवडीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडली. यावेळी अध्यक्षपदासाठी ओमसिंग राजपूत, रवी पाटील, पृथ्वीराज गायकवाड, मोहन पऱ्हाड, अरविंद होंडे, राजेंद्र काळे व आदेश कांडेलकर यांनी इच्छा व्यक्त केली. मग छत्रपतींच्या मंदिरात जाऊन या सर्वांनी मिळून राजेंद्र काळे यांचे नाव पुढे केले.. ही घोषणा मावळते अध्यक्ष धर्मवीर आमदार संजूभाऊ गायकवाड यांनी केली. त्यानंतर याच पद्धतीने सचिव पदाची निवड करण्यात आली, त्या सर्वांमध्ये उन्मेष शर्मा यांचे नाव जाहीर झाले. या दोघांचाही सत्कार आ. संजूभाऊसह सर्व मावळत्या अध्यक्षांनी केला. शिवजयंती साजरी करू हातात हात घालून- आ. गायकवाड मागील वर्षीच्या बुलढाणा शहरातील शिवजयंतीची नोंद संपूर्ण भारतभर घेतल्या गेली, अनेक ऐतिहासिक प्रदर्शनासह सार्वजनिक कार्यक्रम व भव्य-दिव्य देखाव्यांमुळे ही शिवजयंती अभूतपूर्व ठरली होती. तीच परंपरा याहीवर्षी कायम ठेवायची आहे. तेव्हा सर्व माजी अध्यक्ष व राहुन गेलेल्या पदाधिकाऱ्यांनी या शिवकार्याचा शिवधनुष्य हातात हात घालून पेलायच आहे, असे आवाहन धर्मवीर आमदार संजूभाऊ गायकवाड यांनी करून नवनियुक्त अध्यक्ष राजेंद्र काळे व सचिव उन्मेष शर्मा यांचे स्वागत करून त्यांना शिवकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व मावळे मिळून इतिहास घडवूया- काळे



आपण सर्वजण छत्रपती शिवरायांचे मावळे आहोत, आपण सर्वांनी मला अध्यक्ष केले असली तरी मी एक मावळा म्हणूनच या उत्सवाची जबाबदारी आपल्या सर्वांच्या सहकार्याने पेलण्याचा प्रयत्न करील व आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून आपण ही शिवजयंती भव्य-दिव्य व ऐतिहासिक करूया.. अशा भावना यावेळी नवनियुक्त अध्यक्ष राजेंद्र काळे यांनी व्यक्त करून पावन मंदिर परिसरातील पवित्र जमिनीवर माथा टेकवून सर्व उपस्थितांना वंदन केले.

# प्रवाशांच्या वादामुळे बस ट्रकला धडकली!

## ६ ते ७ प्रवासी जखमी!

जनसंचलन/बुलढाणा

अपघातांच्या घटना दिवसागणीक वाढताहेत.काही वेळापूर्वी आणखी एक अपघाताची बातमी हाती आली. मेहकर वरून छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या बसने एका ट्रकला मागून धडक दिल्याने या अपघातात ६ ते ७ प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.विशेष म्हणजे बस मध्ये दोन प्रवाशांचे वाद झाले होते या वादामुळे बस चालकाचे स्टेरिंग वरील नियंत्रण सुटल्याचे सांगण्यात येत आहे. मेहकर वरून छत्रपती संभाजी नगर कडे जाणारी ही बस ब्राह्मण चिकना जवळील पेट्रोल पंप जवळ एका ट्रकला धडकली.एसटी बस मधील प्रवाशांपैकी २ प्रवाशांचा वाद झाल्यामुळे हा अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे.अपघातातील जखमींना बीबी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनास्थळावर बीबी पोलीस दाखल झाले असून पंचनामा सुरू आहे.

# वाहतूक पोलिसांच्या हायटेक प्रशिक्षणाला एसपी पानसरेंचा ग्रीन सिग्नल!

जनसंचलन/बुलढाणा



खाकी वर्दीला कर्तव्यनिष्ठा ही जपावीच लागते! जनतेसाठी व नेतृत्वाखालील ऑन ड्युटी २४ तास कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कृतिशील राहून, विविध उपक्रम राबवावे लागतात आणि सेवा घडवावी लागते. अलीकडे वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत करण्यासाठी एसपी विश्व पानसरे यांनी ट्राफिक पोलिसांना हायटेक प्रशिक्षण देण्याचा संकल्प केलाय.पहिल्या टप्प्यात ट्राफिक पोलीस शाखेचे ३२ कर्मचारी मुंबईतील भायखळा येथील प्रशिक्षण संस्थेत दाखल झालेत. बुलढाणा जिल्हा पोलीस दलातील कर्मचाऱ्यांसाठी व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी एसपी विश्व पानसरे हे नेहमीच झटत असतात. अलीकडे वाढलेली वाहतूक समस्या अधिक सुरळीत करण्यासाठी त्यांनी संकल्प केला आहे.त्यामुळे आता वाहतूक शाखेतील पोलिस प्रशिक्षित होणार आहेत. जिल्हा वाहतूक शाखेत कार्यरत असलेल्या पोलिसांना वाहतूक कोंडी कशी सोडवावी, वाहतूक व्यवस्थापन, सिग्नल यंत्रणा व इतर बाबींचे आवश्यक प्रशिक्षण दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात वाहतूक शाखेचे ३२ कर्मचारी मुंबईस्थीत भायखळा येथील प्रशिक्षण संस्थेत दाखल झालेत. त्यांना मुंबईतील वाहतूक व्यवस्थापन, वाहतूक नियम व इतर बाबींची प्रशिक्षण दिले जाणार आहे.

